
श्रीकांत पवार
मृत्युघंटा

# मृत्युघंटा

श्रीकांत पवार

ई साहित्य प्रतिष्ठान

मृत्युघंटा (Mrutyughanta)

कथासंग्रह

लेखक : श्रीकांत पवार

मोबाइल:- ९१३०५९३८५७, ७८४१८६३३६५

कसबे तडवळे ता. व जि. उस्मानाबाद

e.mail:- pawarshrikant31@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

©esahity Pratishthan®2015


- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# काउन्टडाऊन...



प्रतिभाशक्ती म्हणजे टाईममशीनच! मृत्युघंटा अशीच अनोखी विश्वात सफर घडवून आणणारी टाईममशीन आहे. या सफरीचा आनंद लुटण्याआधी मनोगताचे काउन्टडाऊन सुरू करूया...

# एक............

प्रत्येक जन्मणाऱ्या माणसाला निसर्गतःच माहित असते की आपला मृत्यु कधी तरी निश्चीतच होणार आहे. या भीतीच्या दडपणात त्याला वावरावे लागते. मृत्यु हा सुध्दा कधी कोणता मुखवटा घालून आयुष्यात येईल याचा भरंवसा नसतो. आयुष्यात अशा अनेक गूढ भावना दडलेल्या आहेत. माणसाचे आयुष्य वरवर खूप साधे व सरळ वाटत असले तरी ते खूप गूढ असते. आयुष्यावर जसे प्रेम आहे तसे आयुष्यातील गूढतेवर माझे खुप प्रेम आहे. खऱ्या प्रेमाला कधीच कारण नसते. तसेच माझे हे प्रेम आहे. कल्पनाशक्ती एवढी भरारी घेत असते की त्याला कोठेतरी बांध घालावे लागतात म्हणुन लिहायला सुरूवात केली. मी लिहत असलेल्या कथा काल्पनिक असल्या तरी त्याची वास्तवाशी नाळ आहे. लिहत असताना त्यातील पात्र मला भेटायला आली. मीही गिनीपिग व बुध्दाचा चेहरा मधील विवरात गेलो. रूधीर अश्वमेध मधील प्राचीन काळात गेलो.

दोन............

नवीन शोधायचे आणि मांडायचे ही आवड (खोड!) असल्यामुळे पत्रकारिता हे करियर निवडले. गेली सात वर्षे पुण्यात बातमीदारी केली. सध्या लातूर शहरातील एका नामांकित कॉलेजमध्ये नोकरी करत आहे.

तीन......

ई-साहित्यने माझ्यासारख्या नवोदित लेखकांसाठी अभिव्यक्तीसाठी एक सशक्त माध्यम मिळवून दिल्याबद्दल कायम ऋणी राहीन. पुस्तक प्रकाशनाच्या कोणत्याही प्रसववेदना न देता उलट अत्यंत प्रोत्साहन दिल्याबद्दल ई-साहित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुनिल सामंत व सुंदर पुस्तक तयार करणाऱ्या सर्व ई-साहित्य टीमचा खूप आभारी आहे.

चार......

गूढ, रहस्यमय  व चाकोरीबाह्य अशा साहित्याची आवड असणाऱ्या चोखंदळ वाचकवर्गाला ही साहित्यकृती आवडेल अशी अपेक्षा आहे. एक स्पेशल थीम घेवून नवीन रहस्यमय कथासंग्रह प्रकाशित केला जाणार आहे. आपल्या अनमोल सूचना , प्रतिक्रिया व टीकांचेही स्वागत आहे. माणसाला ज्ञान मिळाले की अहंगड तयार होतो. त्यामुळे त्याला साध्या गोष्टीतूनही आनंद घेणे जमत नाही. वादविवाद- चर्चा आणि विश्लेषण यामध्ये चैतन्य हरवून जाते. त्यामुळे नम्र विनंती की फक्त वाचनाचा मनसोक्त आनंद घ्या.. कथेतील पात्र तुमची वाट पाहत आहेत.

घंटेची किणकिण सुरू झाली आहे...मृत्युघंटेचे टाईममशीन सुरू झाले आहे.

आपला नम्र

श्रीकांत विलास पवार

# अर्पणपत्रिका

बालपणीच सोडून गेलेल्या प्रेमळ आईच्या  स्मृतीस

व खंबीर मनाच्या ऊर्जेचे प्रेरणास्त्रोत असलेल्या वडिलांच्या चरणी

तसेच गूढ , अज्ञात अशा वैश्विक शक्तीस

हे साहित्यपुष्प अर्पण !

---श्रीकांत

# कथानुक्रम

- रुधीर अश्वमेध
- गिनीपिग व बुध्दाचा चेहरा
- हरवलेला चेहरा

# रुधिर अश्वमेध

अंडाकृती आकाराची, शुभ्र रंगाची ‘चंद्र’ नामक मानवी कवटी आकाशात फिरवली जात होती. त्या भयाण रात्रीला साथ देण्यासाठी जणू चंद्राने आपले रुप पालटले. वेगाने तो पळत होता. सूक्ष्म नजरेला तो धूर्त वाटत होता.

‘रात्रदेवी’ संसारातील समस्त जीवांना आपल्या कुशीत घेऊन त्यांचा श्रमपरिहार करणारी. तिचं रुप मात्र कोणी पाहिले आहे? आपले रुप लपविण्यासाठी तिने काळयाकुट्ट अंधाराचा आधार घेतला आहे. पण त्यामुळे ती भयावह दिसू लागते. ती भय हेच दागिने म्हणून परिधान करते.

अंधारलेल्या आकाशाच्या गुहेत प्राण्यांचे डोळे मिचमिच चमकावेत तसे चंद्र-तारे चमकत होते. त्यांचं लुकलुक करीत राहणं अगदी तंतोतंत डोळयांची उघडझाप वाटत होती. त्या डोळयामागे अंधार दाटल्याने आकाशात अनेक हिंस्त्र प्राणी ठाण मांडून बसले आहेत, अन पाहण्याऱ्याकडे रोखून पाहत आहेत, असे वाटत होते. वातावरणात सर्वत्र

गूढतेची कमलपुष्पे उमललेली जाणवत होती. गडद अंधाराच्या रुपाने त्यांचा गंध दरवळत होता. अश्या मध्यरात्रीच्या वेळी सोसाट्याचा वारा सुटला. वातावरणातील गारवा आणखीनच वाढला.

तीच ती नगरी! ज्या नगरीत प्रसिद्ध मात्रा देवीचे मंदिर होते. मात्रा नगरी. नगरीच्या मधोमध मात्रा देवीच प्रचंड पण कलात्मकतेचा अजब नमुना असलेल ते एक सुंदर मंदिर होतं. शुभ्र रंगाचं मंदिर नजरबंदी करायचा लावणारे होते. त्या मंदिराकडे पाहताना आपण पृथ्वीवर नसून दुसऱ्या ग्रहावर आहोत, अशी पुसटशी शंका त्या मंदिराच्या स्वर्गसौंदर्यामुळे येत असे.

समुद्रात भरती आल्यानंतर लाटा रौद्र रुप धारण करून उंचावतात तेव्हा त्यांचे विलक्षण शुभ्र रंगाचं रूप आपल्याला निसर्गशक्तीपुढे नतमस्तक करायला लावते. त्या मंदिराची रचना कदाचित त्याचमुळे तशी केलेली होती. देवालयाच्या गाभाऱ्यात मुंडके नसलेली 'मात्रा देवी' होती. त्या देवीसंबंधीची एक शिलालेखावर आख्यायिका कोरलेली होती. त्या कथेचा अर्थ असा की असुरांचा नि:पात करायला जाताना ही देवी त्यांच्या दुष्कृत्यामुळे प्रचंड क्रोधीत झाली होती. क्रोधाने तीने स्वत:चं मस्तक स्वत: धडावरून उपसून काढल अन त्या अवस्थेत तिने दैत्य सैन्यांचा संहार केला.

मात्रा देवी! म्हणजे क्रोधाचं, मृत्यूचं मुर्तीमंत रुप मानलं जायचं. नगरातले लोक नित्य तिचे दर्शन घेत. त्या नगरीचे राजे, पूर्व पंरपरेनुसार सुर्योदयापूर्वी तिची षोडशोपचार पूजा अखंडीतपणे करत आलेले आहेत. त्या मंदिराजवळ दुर्गटेसे एक संकुल

होते. दिवस असताना व दिवस उगवत असताना नगरातले स्त्री व पुरुष मिळून नृत्य करीत असत.

तेवढयात ‘राजन’ म्हणून राजवैद्याची हाक कानावर हळूवार पोहचल्याने राजा भानावर आला. लगेच उत्तरला, ‘बोला वैद्यराज’ आज संध्या उलटून जाण्याची वेळ झाली तरी अस मौनपणे थांबण्याचं कारण काही विशेष आहे का? आवाजातील जरब वैद्यांच्या नाडीचे ठोके वाढवत होते. राजवैद्यांना वाटलं ‘हा प्रश्न मी तुम्हालाही विचारू शकतो’ अस म्हणावं. पण ते शब्द मस्तकातील स्मृतिकप्प्यात त्यांनी शिताफीने फिरविले. वयाने जरी आपण मोठे आहोत तरी महाराज “महाराज” आहेत याची त्यांना पुरेपुर जाणीव होती. ‘महाराज’ हा सेवक आता जीवनातली संध्याकाळ प्रभूचरणी अर्पण करू इच्छितो.’ त्यांचं वाक्य अर्धवट ठेवत राजा म्हणाला, ‘रुग्णांची म्हणजे राजपरिवाराची सेवा ईशसेवाच आहे. तेव्हा विश्रांती कशासाठी मागत आहात?’

तेव्हा राजवैद्य खरोखरच गोंधळात पडला. रुग्णांना विश्रांतीचा सल्ला देणाऱ्या राजवैद्यांच्या विश्रांतीकडे आजवर कुणीच लक्ष दिलं नव्हतं. त्यातच त्यांच्या चांगल्या राहणीमान व प्रकृतीमुळे थकलेल्या मनावर पडदा पडलेला होता. खरोखरच त्यांना विश्रांती हवी होती का? पण एका विशिष्ट कार्यासाठी ज्याचा संबंध थेट राज्याच्या सुरक्षेशी होता.

‘राजन, सकाळी हेरांनी आणलेली बातमी अजून माझ्या कानात घुमतेय. दूर पश्चिमेकडील नगरंच्या नगरं उध्वस्त होत आहेत. त्यामागचं नेमकं कारण अजून आपल्याला व मित्र राज्यांना लागलेले नाही. त्याचा शोध घ्यायची माझी इच्छा आहे महाराज.’

राजवैद्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. राजाही उत्साहीत झाला. ‘राजवैद्य, तुम्ही खऱ्या अर्थाने “आमचे” आहात. खरंतर सकाळी राजदूताने पश्चिमेकडील नगरांच्या संहाराची बातमी सांगितली तेव्हापासून त्या अनामिक संकंटाचा मी विचार करतोय.’

‘राजन, योग्य वेळ येताच तुम्हाला त्या संकटाबद्दलची सर्व रहस्ये सांगीन. फक्त माझी एक अट पूर्ण करावी, महाराज.’

‘नि: संकोच सांगा, तुमची प्रत्येक अट मी पूर्ण करीन हे राजपद सुध्दा देईन. मला केवळ माझ्या जनतेची सुरक्षितता हवी. बोलताना राजाच्या कपाळावर आठ्या पडल्या होत्या. राजवैद्यांची अट ऐकण्यासाठी त्यांचे कान टवकारले होते.

‘राजन मला सेवेतून मुक्त करावे, त्याचबरोबर एका गुप्तस्थळी महाल बांधुन द्यावा, राजवैद्यांना केवळ एवढीच अभिलाषा होती.

राजाने निश्चितपणे उसासा टाकला. राजाने खूण करून राजवैद्यांना जवळ बोलाविले. हातातील मध्यमेतील नीलांगुठी काढून वैद्यांच्या हातावर ठेवली. या अंगुठीमुळे

हवा तसा महाल तुम्ही हवा तेथे बांधुन घेऊ  शकता. आणि प्रश्न राहीला तो सेवामुक्तीचा. उद्याच आम्ही नव्या राजवैद्यांची नियुक्ती करून तुम्हाला करून तुम्हाला मुक्त करू'

एवढे बोलून राजा दरबारातून निघून गेला. राजवैद्यांच्या डोक्यात भविष्यातले नियोजन तरळत होते. त्यांना एकांतवासात औषधी वनस्पतींचा अभ्यास करण्याचाच विचार चालू होता.

दुसऱ्याच दिवशी नगरात दवंडी पिटवण्यात आली. 'ऐका, लोकहो! आपल्या नक्षत्रनगरीत नवीन राजवैद्य नियुक्त करायचे आहेत. तेव्हा रोग व उपचार यांचं ज्ञान असणाऱ्या व्यक्तींना दरबारात आमंत्रित करण्यात येत आहे हो!'

खड्या आवाजातील त्या दवंडीने नगरात नव्या राजवैद्याबाबत चर्चाही सुरु झाली. शेजारील नगरीलाही या संदेशाचे खलिते गेले.

सगळे इच्छुक 'वैद्य'  मात्रा मंदिरात दुसऱ्या दिवशी पोहोचले. तेव्हा राजा मात्रा देवीची पूजा करीत होता. राजाची पूजा संपताच ते त्याच्या मागोमाग राजमहालात आले.

त्या इच्छुकांत दूरदूरच्या नगरातून आलेले अनुभवी, निष्पाण वैद्य होते. तर काही अनुभवी पण वैद्यकशास्त्राचे सलोख ज्ञान असणारे चिकित्सक होते. प्रत्येकजण राजवैद्याच्या मानाच्या पदाची अभिलाषा बाळगून होता. त्यामुळेच ते सर्व आपण नगराच्या परंपरेचा आदर करतो हे दाखविण्यासाठी सुर्योदयापूर्वीच मंदिरात हजर राहिले होते.

दरबारात राजाने हाताने खूण केली. लगेचच एक सेवक पुढे आला. आणि मोठ्या आवाजात त्या समूहाकडे पाहत म्हणाला. ‘जो कुणी या आजारी इसमाला योग्य रोगनिदान करून योग्य उपचार करील याला या पदावर नेमले जाईल.’

दोन सेवकांनी लाकडी पलंग उचलून आणला. त्यावर एक रुग्ण पडलेला होता. त्या इसमाचे वयाच्या तिशी दरम्यानचे, मुखमंडल काळवंडलेले होते. तो गाढ झोपल्यामुळे क्षणभर ते प्रेतच आहे असा भास निर्माण झाला.

राजवैद्य पदासाठी इच्छुक असलेल्यांपैकी एक चिकित्सिक पुढे गेला. त्या तरूणाची नाडी तपासू लागला. त्यांनी सांगितले की, ‘त्या तरूणाचा श्वास अत्यंत संथ चालत आहे. त्याला श्वसन व्याधी असून त्याचा शरीराच्या दुर्गंधीवरून तो जास्तीत जास्त सहा महिने जगू शकेल, असे खात्रीने सांगता येईल.

वेगवेगळ्या श्ब्दात पण याच अर्थाने निदान प्रत्येक चिकित्सकाने करून रोगोपचाराबाबत असमर्थता व्यक्त केली. राजाने त्या प्रत्येक वैद्याला त्यावर उपचार करावे असे सांगितल. त्यावर त्या साऱ्या वैद्याचं एकमत होत की, उपचार करण व्यर्थ होते. याप्रकारे त्या सभेत सगळ्या वैद्यांची परीक्षा झाली होती. राजाला त्या वैद्यांच्या हतबलतेचा राग आला असावा. त्यामुळेच तो कर्कश आवाजात म्हणाला, ‘पंडीत मुर्ख आहात तुम्ही कोणताही इलाज न करता मरणप्राय वेदना सोसणाऱ्या त्या रुग्णाच्या मृत्यूची वेळ मात्र बरोबर सांगत आहात.’

दरबारात अचानक शांतता पसरली.

तेवढ्यात एक पहारेकरी दरबारात आला. ‘महाराज, मुख्य द्वाराशी एक वैद्य आले असून प्रवेश अनुमती मागत आहेत.

राजाचे डोळे रागाने लालबुंद झाले. पहारेकऱ्यांवर ओरडत राजा म्हणाला, ‘वैद्यांसाठी अनुमती कशाला मागतोस? त्यांच्यासाठी तर आजचा दिवस राखून ठेवलेला आहे. ताबडतोब त्यांना येऊ  दे.’

पहारेकऱ्याने त्या वैद्याच्या सोडले. तो वैद्य मोठ्या दिमाखात चालत दुतर्फ़ा थांबलेल्या त्या मावळलेल्या स्पर्धकांकडे तुच्छतेने नजर टाकीत त्या रोग्याच्या मंचकाजवळ येऊन उभा राहिला. त्याच्या डाव्या हाताच्या नाडीचे ठोके मोजताना त्याने दुर्गंधी सहन न होऊन नाकाला उजवा हात लावला. त्याने सभोवार दृष्टी फिरवली. जणू तो सांगत होती. ‘मी अचुक निदान केले आहे.’  त्याच्या डोळयांना असंख्य दरबारकऱ्यांचे तीक्ष्ण बाण टोचू लागले. एका क्षणात त्या वैद्याबद्दल इतरांच्या मनात ‘कानामागून आला आणि तिखट झाला.’  अशा रितीने असूया उत्पन्न झाली होती. कमरेला खोवलेली छोटीशी पिशवी त्याने उघडली. अन त्यातील औषधी भुकटी बोटांच्या चिमटीत घेतली. मंचकावरील रोग्याच्या तोंडात टाकली. राजा त्या वैद्याकडे आश्चर्याने पाहत होता.

सभागृहातले सगळे दरबारी आणि ते जमलेले वैद्य डोळयात प्राण आणून काय घडतंय ते डोळयात साठवण्याच्या प्रयत्न करत होते.

मंचकाजवळील तो वैद्य शांतपणे हाताची घडीघालून रुग्णाचा प्रतिसाद कशा प्रकारे येतो ते पाहू लागला. काही क्षणातच रोगी त्या औषधाचे परिणाम दाखवू लागला. काय झाले? अचानक तो रोगी तडफड तडफ़ड करीत विव्हळू लागला. वेदनेने त्याने किंकाळी फोडली आणि त्याने प्राण सोडला.

काही वेळेपूर्वी शांत झोपलेला तो इसम. आता मरण पावला होता. त्याचा निळा पडलेला चेहरा झालेला विषप्रयोग उघड उघड सांगत होता. दरबारातल्या सर्वच लोकांच्या पायाखालची जमीनच आता घसरली होती. तो रुग्ण कोण होता? वैद्याला राजा फासावर चढविणार की हत्तीच्या पायदळी तुडविणार किंवा आणखी कोणत्या अमानुष पद्धतीने या वेडगळ वैद्याला मारू शकतो याची ते आपआपसात चर्चा करू लागले. किमान पात्रता न पाहता राजाने भोंदूला संधी देऊन राजानेच चूक केली आहे असे म्हणू लागले. कोणी त्या वैद्याला ‘वेडा’  म्हणू लागले. पहारेकऱ्यांचं, सेनापतींचं तर असं मत बनलं होतं की शत्रूपक्षाची ही चाल असावी.

दरबारातल्या कुजबुजीमुळे बाजारातल्या गोंगाटाचे स्वरुप प्राप्त झाले. राजाने हाताने तीनदा टाळी वाजविली. समोर सेवक येताच त्याला राजवैद्यांची मानाची पगडी व सुवर्ण नियुक्तीपत्र आणायला सांगितले. दरबारात पुन्हा पूर्वीसारखी शांतता पसरली.

राजा आसनावरून उठून उभा राहिला. दरबारातले लोक त्याचे शब्द ऐकण्यासाठी आतुरतेने ध्यान देऊ  लागले. ‘वैद्यराज, आपण असा क्रूर उपाय केला आहे. तो ठीकच आहे. तो रोगी म्हणजे आमचा मोठा बंधू होता. असाध्य रोगामुळे, त्याच्या वेदनेने तो

क्षणाक्षणाला मरणप्राय वेदना सहन करायचा. त्याचे रोजचे मरणाहून भयंकर असे जीवन त्यालाही व आम्हालासुध्दा नकोसे झाले होते. दरबारात आणण्यापुर्वी त्याला भूल दिली होती. त्याच्यावर उपाय सुचत नव्हता. त्याला एकदाचे मरण देऊन तुम्ही त्याची मुक्तता केली आहे. हे भयंकर कोडे तुम्ही सोडविलेले आहे. यामुळे मी तुमची राजवैद्यपदी नियुक्ती करत आहे.'

असे म्हणून राजाने स्वत: त्या वैद्याच्या जवळ जाऊन ती रत्नजडीत पगडी त्या वैद्याच्या शिरावर घातली.





# गिनीपिग व बुध्दाचा चेहरा!

बुध्दाच्या चेहऱ्यावरील शांतता किती गूढ असते ! आपण भौतिक सुख मिळविले तरी आपल्या चेहऱ्यावर बुध्दाच्या चेहऱ्यावर असणारी तृप्ती कधीच दिसली नाही किंवा जाणवली नाही याची खंत डॉ. अहर्निश यांना सतत जाणवत होती. कॉपी-पेस्ट करण्याएवढे शांततेचे भाव चेहऱ्यावर चिकटविणे सोपे नसते. किती दिवस तरी खूप दिवसापासून दूरवरचा प्रवास करावा असे मनात येत होते. अशाच पध्दतीचा शांतीचा शोध

घ्यावा असे त्यांनी ठरविले होते.

डॉ.अहर्निश यांनी त्यासाठी गुगलवर सर्च करायला सुरूवात केली. एक लिंक दिसत होती. वेबसाईटवर लिहले होते. सहलीचे सुवर्णक्षण फक्त आमच्यासोबत............! कोकणातील त्या रम्य स्थळाचे वर्णन वाचूनच त्यांनी बुकिंग करायचे ठरविले.

वेबसाईटवरील फोन नंबरवर फोन लागला एकदाचा...! आवाजातील चढ-उतारावरून समोरचा व्यक्ती खुप फास्ट बोलत होता. त्याच्या माहितीवरून कोकणातील एका रम्य अशा गावात त्यांनी पिकनीक स्पॉट निर्माण केला होता. लॉकरूम डेस्टीनेशन हे त्या स्पॉटचे नाव होते. कुणीही सोम्यागोम्या त्या ठिकाणी जाऊ शकत नव्हते. तर त्यासाठी मेंबर्सचा पास मिळविणे आवश्यक होते. त्या वेबसाईटवर व्यक्तीचे नाव व व्यवसाय निवडले की एका प्रश्नाचा पर्याय देण्यात आला होता. संगणकावर प्रश्न विचारण्यात आला होता. फीटस येवू नये यासाठी काय उपाय आहे? भरभर डॉक्टरांनी टाईप केले. चांगले औषध व डॉक्टर किती आवश्यक आहे हे त्यांनी चांगल्या पध्दतीने मांडले. स्वतःच्या हुशारीचे त्यांना कौतूक वाटू लागले. काही सेकंदातच मेंबर्सचा लॉग इन पासवर्ड दिसू लागला.

लॉकरूम डेस्टीनेशन हे ठिकाण फक्त खास लोकांसाठीच होते. घर व घरात आठ दिवस राहता येणार होते. राहण्यासाठी उत्तम सुविधा होत्या. घराशेजारीच असणाऱ्या तलावात मासे पकडणे व संध्याकाळी चांदण्यात फिरता येणे शक्य होणार होते.घराचा आकार एका विशाल मगरीच्या जबड्यासारखा होता. घरात गेल्यावर त्यांच्यावर फुलाचा

वर्षाव करण्यासाठी खास महिला होत्या. त्या घरात आल्यापासून त्यांना फ्रेश वाटू लागले. रोजचे तेच आणि तेच ते आयुष्य जगणे कंटाळवाणे होवू लागले की माणुस नकळत अदभुत आणि रहस्यमय प्रसंगाची वाट पाहू लागतो.

निसर्ग पर्यटनात एक बरे असते. सतत माणसाला वाकुल्या दाखविणाऱ्या व त्याच्या क्षुद्रत्वाची जाणिव करून देणाऱ्या उंच इमारती नसतात. तसेच माणसाला रूक्ष व निष्काळजी करणाऱ्या मशिन्सही नसतात. अन्यथा एरवी मशिनमय झालेल्या माणसाला जिवंत, रसरशीत व तजेलदार निसर्ग एवढा सुखावला नसता. हिरवागार निसर्ग व मंद गार वाऱ्याची झुळूक म्हणजे चित्रपटातील अभिनेता अभिनेत्रीला राजी करण्यासाठी गाणेच म्हणत आहे असेच त्यांच्या मनाला क्षणभर वाटले.

सकाळचे सात वाजले होते. थंड वाऱ्याची झुळुक घेत कधी त्या उबदार मखमली बिछान्यात झोप लागली हे समजलेही नव्हते. सकाळच्या वेळी एक मुलगा चहा घेवून आला. शाल पांघरून आलेल्या त्या मुलाचे सर्व शरीर अंग झाकले होते. अंथरुणात बेड-टी घेण्याची सवय नव्हती. परंतू आजचा दिवस आपण बेड-टी घेतली तर काय हरकत आहे म्हणुन त्यांनी चहा घेतला.

त्या मुलाच्या चेहऱ्यावरील काळसरपणा कुठे पाहिला होता? मॉडर्न चित्रातील काळसरपणा तो खचितपणाच नव्हता. एकाकी आठवणीतील स्मृतीकप्प्यातून जून्या डायरीतील पाने पलटावीत तशी एक एक आठवण उलगडू लागली. उलगडताना तो दिवस डोळयासमोरून एखाद्या चित्रपटाप्रमाणे जाऊ लागला. एका बहुराष्ट्रीय कंपनीचा

एमआर नुकताच येवून गेला. १५ मार्चचा तो दिवस! फीटसवर त्यांचे नवे उत्पादन बाजारात येणार होते. त्यासाठी प्रयोग करावे लागणारे गिनीपिग हवे होते त्याला. त्यासाठी लाखभर रूपये डॉक्टरला मिळणार होते. रग्गड पैसा कमविण्यासाठी चांगलीच संधी मिळाली होती.

दुसऱ्याच दिवशी खेडेगावातून एक २२ वर्षाचा मुलगा उपचारासाठी आला होता. फीटसचा झटका आलेला मुलगा बेशुध्द झाला होता. डॉक्टर साहेब, काय पण करा. पण पोराला एकदाचं बरं करा. सारखं झटकं येत्यात.डॉक्टरने तपासायला सुरुवात केली. तसे त्यांच्या डोक्यात कालच्या एमआरच्या भेटीचे विचार तरळु लागले. त्या मुलाला शुध्द येताच त्यांनी त्या कंपनीचे औषध दिले. मुलाचे शरीर काही दिवसांनी काळेठिक्कर पडले. त्याची वाचा गेली. त्याचे स्वतःचे शरीरावरील संतुलनच ढासळले. त्याचा बिच्चारा वडील नशीबालाच दोष देत राहीला. त्या चहा घेवून आलेल्या मुलाच्या शरीरावरील काळसरपणा थेट त्या आजारी पडलेल्या मुलासारखाच जाणवू लागला होता.चेहऱ्यावर त्याच्या किती निरव शांतता होती.

तो सुमंत होता. सुमंत हुशार व कष्टाळु मुलगा होता. परिस्थितीमुळे शिक्षण घेणे शक्य झाले नाही. वयाची विशी उलटुनही केवळ फीटसवर उपचार करणे शक्य नसल्यामुळे सुमंत शेतात राबत होता. पुण्या-मुंबईत उपचार करण्याएवढा पैसा कमविणे शक्य होते. पण कधी कधी येणाऱ्या फीटसमुळे त्याची माय त्याला शहरात काम करायला सोडत नव्हती. न जाणो काम करताना फीट आली आणि कुणीच लक्ष दिले नाहीतर अनर्थ ओढवायचा.

परंतू सुमंतच्या वडिलांचे याउलट मत होते. शहरात याच वयात त्याने काम

केले तर चांगली लिंक लागेल. नवीन चार गोष्टी शिकता येतील. पाऊस पाण्यावर शेती अवलंबून असल्याने सगळे आयुष्य शेतीच्या जीवावर जगणे शक्यच नव्हते.काम केल्याशिवाय आपले पोट भरणार आहे का ? काम करतच मरायचं आणि जगण्यासाठी लढाई करायची.... तुझ्या फीटसवर उपचार करू आणि लवकरच तुला बरे करू.... उपचार केल्यानंतर काही दिवसात सुमंत पुण्यात काम करण्यासाठी गेला. परंतू काही दिवसातच अहर्निशच्या औषधांचा साईड ईफेक्ट सुरू झाला. आणि आयुष्यावरच कुऱ्हाड कोसळली. सुमंतच्या वडिलांनी त्याला दवाखान्यात आणल्यानंतर सगळे संपलेले होते......

अहर्निशला प्रवासाचा तो दिवस आठवू लागला. डॉक्टर्सनी ड्रायव्हरला गाडी काढायला सांगितली. प्रवासात तो आज एकटाच निघाला होता. पत्नी रितालाही सेमिनारला जातोय एवढेच सांगून ट्रीपला निघाला. ओव्हरलोडमुळे कंटेनर उलटला होता. नेहमीप्रमाणे घाटात ट्रॅफीक चांगलीच जाम झाली होती. अहर्निश जाम वैतागला होता. ड्रायव्हरने कसा तरी मार्ग काढीत गाडी ट्रॅफीकमधून बाहेर काढली. गाडीतून जात असताना काचेतून त्याने बाहेर मान डोकावली. रस्त्यावर एका तरूणाचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. सुरूवातीला प्रॅक्टीस करताना अपघातात जखमी झालेले रूग्ण पाहिले की त्यांच्या जखमा व रक्त पाहूनच त्याला मनात चिंता व भय नाहीसे झाले. तरीही घाटातील तरूणाचा चेहरा त्याच्या डोळ्यासमोरून जाईनासा झाला.

“किती निष्काळजीपणे गाडी चालवितात. यांना रस्त्यावर गाडी चालविण्यासाठी परवाना कोण देते?” अहर्निश रागात ड्रायव्हरकडे पाहत म्हणाला.

ड्रायव्हर सहजपणे म्हणाला, “साहेब, जाऊ द्या. मरण यायचे म्हणजे माणुस कसातरी ओढला जातो. माणुस मरणात ओढला जातो?”

हे त्याचे वाक्य अहर्निशच्या मस्तकात शिरले. मृत्यु हे चक्रव्युह आहे. यामध्ये प्रवेश घेणाऱ्याला माहित नसते, पण प्रवेश करावा लागतो. स्वतः पुटपुटत चक्रव्युह वगैरे काही नसते असे. अहर्निश स्वतःलाच म्हणाला.

“गाडी शिस्तीने सावकाश चालव. कोणाला उगाच कुत्र्या-मांजरासारखे मरण येणार नाही.” अहर्निश काहीसा रागाने म्हणाला.

“ होय सर, चालवितो गाडी सावकाशपणे.”

पावसाच्या सरी चालू झाल्या.... बाहेर गडद अंधार..... वायपरच्या आवाजाने शांततेचा भंग चालूच होता.... अहर्निशच्या मनात आज मृत्युबाबतचे विचार आदळायला लागले. अहर्निशला बालपणीचा प्रसंग आठवू लागला. पाण्यात पोहायला शिकत असताना तो पाण्याच्या तळाशी गेला होता. गारशार पाणी व त्याचा ओढून घेणारा तळ त्याने अनुभवला. प्रशिक्षकाला पोहायला शिकवित असताना एकाचवेळी तीन-चार विद्यार्थ्याकडे लक्ष देणे आवश्यक होते. प्रशिक्षकाने गडबडीत अहर्निशकडे थोडे कमी लक्ष दिले. अहर्निश पाण्यात बुडाला होता. पाण्यात गंटागळया खावू लागला. तेव्हा स्विमिंग पूलच्या बाहेर असणाऱ्या लोकांनी ओरडून अहर्निश बुडत असल्याचे सांगितले. तेव्हा कसेबसे प्रशिक्षकाने पाण्यात सुर मारून बुडणाऱ्या अहर्निशला वाचविले. नाका-तोंडात पाणी गेल्याने अहर्निश धापा टाकत होता. श्वास कमी पडू नये म्हणून त्याला कृत्रिम श्वास देण्यात

आला.

पुढे महिनाभर डोळे झाकले तर अहर्निशला पाण्याच्या डोहात बुडत आहोत असा भास होत असे. मरणाच्या दारात जावून आलो. पण त्याचे भय मात्र मानगूटीवर बसल्याचे शल्य बोचत होते. पोहणे शिकल्याने पाण्याची भीती केव्हाच विरून गेली. एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण करून हे भय काहीसे कमी झाले. परंतू रक्ताने होणारे रस्त्यावरील अपघात पाहिले की त्याचे मन चर्र होत असे.

पावसाचा जोर ओसरल्याने वायपरचा होणारा आवाज कमी झाला होता. ड्रायव्हर काळजीने वाहन चालविताना मंद आवाज गुणगुणत होता. जुने किशोरकुमारचे गाणे गुणगुणत असताना त्याच्या आवाजात कमालीचा दुःखी भाव जाणवत होता.

“सर, तुम्हाला एक मनमोकळेपणाने सांगु का ?”

“बोल नाथू मनमोकळेपणाने बोल.” अहर्निश कॉलरची घडी नीट करत म्हणाला.

“अनेक माणसे शहरात हरवतात, गायब होतात. ती कुठे जात असावीत ?” ड्रायव्हर काहीसा संथ आवाजात म्हणाला.

अहर्निश म्हणाला, “हीच माणसे भिकारी तर कधी आजारी पडून तर कधी वेडे होऊन हिंडत असतात.”

ड्रायव्हर चेहऱ्याच्या कपाळयाच्या आठ्या चढवत म्हणाला, “पण काही

माणसे कायमचीच गायब होतात. त्यांचा शोध कधीच लागत नाही."

मध्यरात्रीची वेळ.... रात्रीचे बारा वाजले......... खिडकीतून बाहेर डॉक्टरांची नजर पाण्याच्या टॅंकरवर गेली. त्या लोखंडातून एक आकार तयार होवू लागला. माणसाचा तो आकार होता... ट्रॅकसुट घातलेल्या त्या माणसाचा चेहरा सपाट होता. त्याला नाक, डोळे दिसत नव्हते. डॉक्टरांच्या चेहऱ्यावर भीतीने गाळण आली. एक दोन मिनिटे तो भयंकर व्यक्ती डॉक्टराकडे टक लावून पाहत होता. छे! तो भास नव्हता! आपण अशा निर्जन ठिकाणी एकटेच राहतोय या विचाराने त्यांना आणखीनच भीती वाटू लागली. त्यांची आता झोप उडाली होती. मध्यरात्रीची वेळ संपतच नाही, असे वाटू लागले.

अचानक खोलीच्या बाहेरून किंकाळयांचा आवाज येवू लागला. समोर फेर धरत सगळे ते जीव नाचू लागले. चेहऱ्यावर काही जणांच्या जखमेच्या खुणा होत्या. तर कुणाचे पाय तुटलेले तर कुणाचे हात तुटलेले... त्या रक्तबंबाळ झालेल्या जिवांना किंकाळया फोडत असताना पाहून अहर्निश थरथर कापू लागला. समोरील जमिनीतून विवर निर्माण झाले होते. त्या विवरातून डोळे लख्ख करणारा प्रकाश झोत येवू लागला. दोन हात काळवंडलेले जमिनीतून आले होते. अहर्निशला ते रस्त्यावरील अपघातात मरण पावलेले

असंख्य मृतात्मे विवराकडे ढकलू लागले. अहर्निश विरोध करू इच्छित होता. तरीही तो मनाने खचला.

त्याला आठवू लागले. अपघातात जखमी, मरणाच्या दारात आलेल्या पेशंटला त्यांनी उपचार करण्यास नकार दिला होता. विवरातून खाली डोकावले तेव्हा तिथे हजारो जीव तडफडत होते. ते गिनीपिग होते. त्यांच्या शरीराला विविध कंपन्यांच्या केलेल्या प्रयोगामुळे चित्र-विचित्र आकार आलेले होते. ते अहर्निशच्या पायांना विवरामधून ओढत होते. अहर्निश त्या विवरात खेचला गेला..... त्याच्या डोळयापुढे अंधार दिसू लागला......मध्येच लख्ख प्रकाशाचा झोत येवू लागला. .... कानावरील किंकाळया हृदय पिळवटून टाकत होत्या....... त्या किंकाळयामधून शरीरातील जखमांच्या वेदनाच शब्द बनून सांडत होत्या... आपण मृत्युनंतरचे जीवन अनुभवणार या जाणिवेनेच शरीर अधिक जोरात विवरात फेकले जात होते... त्याच्या शरीराला असंख्य प्रेतात्मे बोचकारे ओढत होते....

अचानक त्याला सगळीकडे सामसूम दिसू लागली होती. डोळे उघडण्याचा प्रयत्न करूनही डोळे उघडत नव्हते. सगळीकडे अंधारच दिसत होता. स्वतःचे शरीर चाचपडू लागला. त्याला आश्चर्याचा धक्का बसला. शरीर अजुनही जागेवरच होते. तो कॉटवरच होता. त्या रिसॉर्टवरची लाईट गेल्याने सर्वत्र अंधार दिसत होता. थोड्याच वेळाने लाईट आली.

भिंतीवरील एक मॉडर्न आर्ट चित्र अहर्निश पाहून सुन्न झाला. शांतता असलेल्या बुध्दाच्या मुर्तिभोवती दोन काळवंडलेले हात दिसत होते. विवरात भेटेलेल्या असंख्य गिनिपिंगाच्या आठवणी डसू लागल्या. काही वेळेस सत्य कल्पनेहून भयंकर असते.

स्वार्थासाठी केलेल्या व्यवसायामुळेच तो पापी गुहेत नकळत ढकलला गेला होता. त्या गिनीपिग करणाऱ्या कंपन्यांना व दर्जाहीन औषधांची विक्री रोखायची याचा विचार करत त्याचे दोन्ही हात बुध्दाच्या अंगुलीमुद्रेप्रमाणे नकळत वळले.





# हरवलेला चेहरा

उन्हाची तिरीप जसजशी वाढू लागली. तसे दाढीवरचे केस चांगलेच टोचू लागले. दिवसभर दाढीचे काटेरी कुंपण ठेवणे जड जाणार होते. दाढी करण्यासाठी गुलाबी आरसा घेतला. सहज आरश्यात पाहू लागलो. स्वतःचा चेहरा पाहताना नकळत कपाळावर आठ्या चढल्या. अजून मी तिशीत असतानाही डोळ्याखाली वलये अजूनही तशीच दिसत

होती. चेहऱ्यावरील गांभीर्य व काळजीची खोली वाढविणारी !

आरशात पाहताना काही सेकंदातच डोळयांवर कमालीचा ताण वाढला. आरसा हातात धरवत नव्हता. आरसा पाहत असतानाच पठाण नावाच्या मित्राने सांगितलेली गोष्ट आठवली. वीकएन्डला त्याने सकाळीच ढोसली होती. कुठेतरी गर्लफ्रेंडला भेटायला जायचे म्हणुन दाढी करू लागला. आणि कसे कुणास ठाऊक दारूच्या धुंदीत त्याने ब्लेड गालावर अशी मारून घेतली की त्याला गालावर तीन टाके घ्यावे लागले. दाढी करताना तो रक्तबंबाळ झाला. त्याला गेट वेल सून म्हणुन शुभेच्छा द्यायला गेलो. तेव्हा तो चांगलाच डाफरला होता. ब्लेड लागली तेव्हा रम चढलीच नव्हती. पण आरश्यातील माणुस म्हणजे मी राहीलो नाही असे तो म्हणाला. दारू ढोसून आरश्यात पाहत होतो पण आरश्यातील प्रतिमा भयंकर संयमी होती. तसा मी नाही. माझा चेहरा कुठे गेला. असा विचार मनात येवून आरश्यातील प्रतिमेने शांततेचे खोटे भाव दाखविल्याने पठाणने रागाने वार केले. ते थेट स्वतःवरच! तरीही आरश्यातील प्रतिमा केवळ हसत होती. गूढपणे! पठाणचे म्हणणे खरे पटणारे नव्हते. पण आरश्यात त्याला स्वतःचा चेहरा का दिसू शकत नव्हता हे एक कोडेच होते.

मी दाढी करताना गडबड कधीच करत नाही. आपली प्रतिमा आपलीच असते. आरश्यातील प्रतिमेला वेगळे अस्तित्व थोडेच वेगळे असते. मी शांत ! तो शांत ! मी स्तब्ध माझी आरशातील प्रतिमा स्तब्ध! सरावलेल्या नजरेने मी आरश्यातील चेहऱ्याला माझ्या प्रतिभेच्या सामर्थ्याने दृष्टी दिली. प्रतिभेच्या सामर्थ्याने अवसान आलेली प्रतिमा आता माझ्या कल्पनेतून हळूहळू विलग झाली. तिने माझ्यापासून पुर्णपणे फाटाफूट केली. माझी

डावी भुवई किंचित उंचावली. तशी आरश्यातील प्रतिमेची भुवई किंचित उंचावली. पठाणचे म्हणणे आठवून त्याच्या बालिशपणाला हसायला लागलो. हसता हसता आरशात पाहू लागलो. मला एक सेकंदभरच वाटले. आरशातील प्रतिमा वर मान करून भुवया उंचावून पाहत होती. कोठेही माणूस म्हणुन रस्त्यावर दिसत नव्हता. चंद्राचा पांढरा लख्ख प्रकाश पडला होता. धुक्याची वलये तयार होवू लागली होती. अधाशीपणे काहीतरी मिळेल या आशेने भटकणाऱ्या कुत्र्यांची भटकंती चालूच होती. अदृश्य सावल्यांना पहात एखादे कुत्रे मध्येच भुंकत होते. शहरातील अनेक जणांच्या प्रतिमा आता आरश्यातून बाहेर येवू लागल्या. माणसाच्या भावनांचे ओझे प्रतिमेत उतरले होते. कित्येक प्रतिमांची गर्दी उसळली होती. त्यामध्ये अनेक चेहरे होते. पांढरपेशी चेहरा घालून कृष्णकृत्य करणाऱ्या व्यक्तींचे... दहशतवाद्यांचे !

पण चेहऱ्यापासून विलग होवूनही त्या माणसाला माहित नव्हते हे विशेष!

माझा चेहरा त्या गर्दीत पाहून मलाही हायसे वाटले. चेहऱ्यावरचे स्नायू जरा आखडलेले होते. तो चेहरा किती घमेंडी वाटत होता. माझा चेहरा मी पाहिला. अन मी स्वतःचा चेहरा हरवून बसलो. दिसेल त्या चेहऱ्याला मी माझा मानू लागलो. इंटरनेटवर युट्यूबवर सेलिब्रिटीजचे व्हिडिओज पाहत होतो. प्रत्येक सेलिब्रिटींचा चेहरा माझाच वाटत होता. पूर्वी मी लष्करात नोकरी केल्यामुळे शिस्त व कठोरपणा चांगलाच अंगात भिनला आहे. आवड म्हणुन शाळेत गणिताचे अध्ययन केले आहे. रामदेवबाबांच्या कसरती बघून योगअभ्यासही सुरू केला.

मग मी कधी लष्करातील कडवा अधिकारी तर कधी रामानुजन गणिती तर

कधी योगी असे चेहरे परिधान केले. पण माझा तोही चेहरा नव्हता. खरेतर मी बिनचेहऱ्याचा माणूस... माझे दुःखही बिनचेहऱ्याच्या माणसाचे! कोणाला त्याचे सोयरसुतक असणारही नाही.!

त्या अनेक चेहऱ्यापैकी मला माझा चेहरा शोधायचा होता. अनेक चेहरे पाहत असताना मी माझ्या जिवलग मित्रांचे चेहरे पाहत होतो. त्यात चेहऱ्यामध्ये पाहून मला बरे वाटू लागले. माझा चेहराच डोळ्यासमोर खिन्न हताश पाहताच मलाच माझाच चेहरा नकोसा वाटू लागला. मला पाहून माझ्या चेहऱ्यानेच किंकाळी फोडली. सगळे चेहरे त्या चंद्रप्रकाशात उजळले. धुके गडद होत गेले आणि चेहरे विरघळून गेले.

तो पाठलाग करतोय.... अनेक वर्षापासून मी त्याला झिडकारले आहे. अजूनही तो दिवस डोळ्यासमोर जसा घडला तसा स्पष्टच उभा राहतो. तो कोण होता ? तो माझाच चेहरा होता. आता मला चेहरा नाही. मला पाहणाऱ्याला माझे डोळे, नाक व चेहरा व्यवस्थित दिसतो. प्रत्यक्षात तसे नाही. जेव्हापासून माझा चेहरा मी त्या रात्री अत्यंत विचित्रपध्दतीने पाहिला, त्या दिवसापासून मी छद्मी झालो. चेहरे चोरू लागलो. कुणी माझ्यापुढे आनंदी होवून उभा राहिले तर मी त्याचा आनंदी चेहरा माझ्या चेहऱ्यावर चढवतो.

त्या दिवशी तसेच झाले. कोणी तरी दानशूराने एका लहानग्या भिकाऱ्याला दहा रूपयाची नोट टाकली. त्याला केवढा आनंद झाला होता. अंगावर फाटके-तुटके कपडे घातलेल्या त्या भिकाऱ्याच्या चेहऱ्यावर आनंदाची किती चमक आली होती. छे! केवळ

महागड्या ब्रॅंडेड कपड्यात वावरणारा माणुसच एवढा सुंदर हसू शकेल असे मला वाटते. किंबहूना तसेच असावे असे मला वाटले. नाहीतर एवढी महागडी कपडे घेवून वावरणाऱ्या माणसाला समाजात विशेष काही किंमत आहे की नाही? मला त्या भिकाऱ्याची कीव वाटू लागली. पण त्याचा आनंद पाहून तेवढीच माझी कीव वाटू लागली. त्या भिकाऱ्याचे डोळे आनंदाने चमकत होते. मी त्याच्या डोळयात डोळे चमकून पाहू लागलो. त्या भिकाऱ्याला मी नजरेतून दम भरत होतो. तू एवढा आनंदी कसा राहू शकतोस?

अनेक चेहऱ्यांचे ओझे वागवूनही मला चेहरा नाही. माझा खरा चेहरा कोणता? लग्नाच्या वेळी माझा फोटो सर्वांना दाखविण्यात आला. त्या फोटोत मीच होतो. पण आज मी पुर्णपणे बदललोय. लहानपणी बाळकृष्णाच्या वेशातील रांगत असतानाचा माझा फोटो किती सुंदर आहे! तरी तो आजच्या व्यक्तीमत्वाला अनुरूप आहे असे वाटतच नाही. फोटो वयाने बदलतात. त्यात आठवणी बांधल्या जातात. पण चेहरा बदलत जातो. तुम्ही कोणता चेहरा पाहिला? स्वतःचा चेहरा आठवतोय का? हो आपला खरा चेहरा आठवतोय का? आपला खरा चेहरा नेहमीच झाकलेला असतो. पिरॅमिडच्या विशाल आकारात मम्मी जपून ठेवावे तसा आपला चेहरा झाकलेला असतो. लहानपणापासूनचे चेहरे आठवू लागले. पण माझा चेहराच हरवलाय हे कुणाला सांगणार ?

पंचमहाभूताचे शरीर असूनही ते सारखे दुसऱ्याच्या चेहऱ्याची कॉपी करते. मी कोण आहे आहे. याचे उत्तर मला माहित नाही.

पंचमहाभूताचां गोळा आकाशात फेकला गेला.

पृथ्वीने गुरूत्वाकृष्ण अर्थात प्रेम केव्हाच सोडून दिले होते.

मी चेहरा हरवून बसलो.

आकाशातील सुरू झालेल्या शेवटच्या प्रवासात मी नेहमीच विचारतो. तुमचा चेहरा कोणता ?

कधी तहानलेला होतो.

कधी विद्यार्थी होतो.

पण मी कधी मीच नव्हतो. नेहमी दुसऱ्याच्या उसन्या भावना घेत होतो. तुमचा चेहरा माझा आहे. तुमचा आवाज माझा आहे. तूमचे भावही माझे आहेत. तुमचा चेहरा कोणता?



# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही व्यावसायिक प्रकाशन संस्था नाही. काही सामाजिक ध्येय डोळयांसमोर ठेवून मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांच्यासाठी ही तरुणांची संस्था काम करते आहे. सध्या ई साहित्य प्रतिष्ठानचे सव्वा दोन लाख वाचक आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या पुस्तक खजिन्यात सातत्याने नवनवीन भर पडत असते. २०१४ मध्ये सुमारे शंभर ई पुस्तके आम्ही प्रकाशित केली. नवीन खूप सारी पुस्तकं लवकरच येत आहेत. एकाहून एक भारी. ही सर्व पुस्तकं सर्वच्यासर्व सव्वा दोन लाख वाचकांना देण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. पण प्रत्येक वेळी ते जमतेच असे नाही. अनेक वाचकांपर्यंत काही पुस्तके पोहोचत नाहीत. पण VIP सदस्यांना मात्र सर्व पुस्तके नक्की दिली जातात. तुम्हाला सर्वच्या सर्व पुस्तके हवी असतील तर VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ई मेलवर सर्वात आधी मिळतं. त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं. त्यांच्या भावी योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2. ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3. आणि यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ मराठी लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण एक दहा-वीस ई मेल आयडी देणारच ना! वाचनाची आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

आहे ना : एक दम : तीन काम.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

www.esahity.com या वेबसाईटला भेट

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान